स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६—२७/३४२ महत्त्वाचे/तात्काळ दि. ०५/११/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम(SIR) मतदार नोंदणीकरिता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत...

संदर्भ: मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे क्रमांक:रासेयो—२०२६/प्र.क्र.६५/रासेयो कक्ष, दि.०३ नोव्हेंबर, २०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये महाराष्ट्र विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार याद्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. तसेच प्रारूप मतदार याद्यांच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. या टप्याचे शेवटचे काही दिवस शिल्लक असून या कालावधीमध्ये मतदारयादित नवमतदार तसेच स्थंलातरीत मतदारांचा समावेश होण्याकरिता विशेष प्रयत्न अपेक्षित आहेत.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंचांमार्फत(ELC) नवमतदारांनी मतदार यादित नाव नोदंविण्याच्या ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज भरून घेण्याकरिता विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, व मतदार नोंदणीबाबत मतदारांमध्ये जनजागृती करावी.

तसेच आपल्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम(SIR) प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविला असेल **अशा विद्यार्थ्यांना ३० तास पुर्ण केले असा शेरा देण्यात यावा,** असे निर्देशीत करण्यात आले आहे. तरी सदर प्रक्रियेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचा तपशील संबंधीत विद्यार्थ्यांमार्फत https://forms.gle/9rHc2ZWviAcTpRES6 या गुगल फॉर्ममध्ये भरून दि. ११ नोव्हेंबर २०२६ पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र. ६५ /रासेयो कक्ष दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२६

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक रासेयो संलग्नित,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/संचालनालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय :-विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (Special Intensive Revision – SIR) मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.

संदर्भ:- कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण – २०२६ / ई – १८७०९८७ / विशि – ५, दि. ०२.११.२०२६.

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) अंतर्गत आपल्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) या कामामध्ये सहभागी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांची संख्या व त्यासंबंधीचा तपशील खालील नमुन्यात सादर करावा.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नावे	महाविद्यालयाचे नाव	वर्ग	तास	शेरा

ज्या विद्यार्थ्यांनी या (Special Intensive Revision – SIR) प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविला असेल त्याच्या समोर त्यांनी ३० तास पुर्ण केले असा शेरा देण्यात यावा असे निर्देश समितीने दिले आहेत. तरी, आपल्या स्तरावरुन दि. १२.११.२०२६ पर्यंत सदर विद्यार्थ्यांची नावे ही राज्य संपर्क कार्यालयास कळवावी.

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID: vishi5.hted-mh@mah.gov.in

क्र. संकीर्ण- २०२६/ई-१८७०९८७/विशि-५

दिनांक : ०२/११/२०२६

प्रति,
विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.

विषय : विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६ मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.

संदर्भ: सह सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सा. प्र. विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. २४/०९/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकीत प्रकरणी रा.से.यो. कक्षाकडून कार्यवाही सुरू असल्याने दि. २७.१०.२०२६ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या दालनामध्ये झालेल्या बैठकीमध्ये प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

(प्रविण अंकोलकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 3353
दि. 28/09/26

क्रमांक: ईएलआर २०२६/प्र.क्र. १०६/निवडणूक ६
सामान्य प्रशासन विभाग
गादगा कामा रोड हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २४ सप्टेंबर, २०२६.

प्रति,
अपर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय: विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६
मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाच्या निदेशांनुसार, राज्यामध्ये मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ ते ३० सप्टेंबर, २०२६ हा कालावधी दावे व हरकती सादर करण्याकरीता निश्चित करण्यात आलेला आहे. सदर कालावधीस मुदतवाढ देण्याची विनंती या कार्यालयाकडून भारत निवडणूक आयोगास करण्यात आलेली आहे. या कालावधीमध्ये नागरिकांकडून नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदीच्या दुरुस्ती व नाव वगळणीसाठी अर्ज सादर करण्यात येणार आहेत.

२. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमापूर्वी ऑक्टोबर २०२४ नंतर मतदार यादी पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आला नसल्याने दिनांक ०१.१०.२०२४ नंतर १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदविता आले नाही. आता, दिनांक ०१.१०.२०२६ रोजी किंवा त्या पूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व नवमतदारांना मतदार यादीमध्ये नाव अंतर्भूत करण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

३. १८ वर्षे पूर्ण झालेले नवमतदार हे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी म्हणून महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत. अशा विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी होवून शकलेली नाही, यांच्याकरीता जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्याबाबत व अशा नव युवकांची नावे जास्तीत जास्त नोंदविण्याच्या सूचना दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. तसेच विद्यापीठ व महाविद्यालयातील कार्यरत राष्ट्रीय सेवा योजनेतील (NSS) विद्यार्थ्यांना स्वयंसेवक (Volunteers) म्हणून सहभागी करुन घेण्याच्या सूचनाही दिनांक ०५.०८.२०२६ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

४. १८ वर्षे पूर्ण झालेल्या जास्तीत जास्त नवमतदार विद्यार्थ्यांना मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्याच्या दृष्टीने आपल्या अंतर्गत सर्व विद्यापीठे व महाविद्यालये यांना जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून विशेष मोहिमेमध्ये सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. याकरीता विद्यापीठे व महाविद्यालयांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेतील (NSS) विद्यार्थी स्वयंसेवक (Volunteers) यांना या कार्यामध्ये सहभागी करुन घेवून त्यांचेमार्फत नवमतदारांचे (विद्यार्थी) नाव नोंदणीबाबतचे नमुने (Form-६) भरुन सदर नमुने संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत आयोजित करण्यात आलेल्या शिबीरांमध्ये सादर करण्याबाबत, संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती आहे.

आपला,

(मनोहर पारकर)
सह सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.